# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड  जा. क्र. 73/2024  दिनांक : 23.02.2024**

## 1)घरफोडी :—

**कुंटूर :—** दिनांक 21.02.2024 रोजी चे 12.30 ते 06.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे वाडयामधुन मौ. कुंटूर ता. नायगांव जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने फिर्यादीचे वाडयाचे घराचे कुलूप फोडुन आत प्रवेश करून वाडयामधील जमिनीवर वाळु घातलेले 06 क्विंटल सोयाबीन किंमती 26,400/—रू चे व चांदीचे पायातील चैन किंमती 4500/—रू चे जुने वापरते असा एकुण 30,900/—रू चा माल चोरून नेला. वगैरे **फिर्यादी शेख पाशा हैदरसाब, वय 49 वर्षे, व्यवसाय शेती व व्यापार रा. कुंटूर ता. नायगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंटूर** गुरनं 24/2024 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1198 कंधारे, मो. नं. 8856080025** हे करीत आहेत.

## 2)चोरी :—

**हदगांव :—** दिनांक 20.02.2024 रोजी चे 22.30 ते 23.00 वा. चे दरम्यान, जि. प. कें. प्रा. शाळा निवघा (बा) ता. हदगांव **जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने शाळेत काम करताना त्याने शाळेमधील 50 किलोचे तीन कटटे तांदुळ किंमती 3,000/—रू चे चोरून नेले. वगैरे **फिर्यादी शिवाजी रामराव इंगळे, वय 57 वर्षे, व्यवसाय नौकरी मुख्याध्यापक जि. प. कें. प्रा. शाळा निवघा(बा.) ता. हदगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगाव** गुरनं 45/2024 कलम 379, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/900 सातपुते, मो.नं. 8329976264** हे करीत आहेत.

## 3)गंभीर दुखापत :—

**विमानतळ :—**दिनांक 20.02.2024 रोजी चे 18.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे राहाते घर नंदीग्राम सोसायटी नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस व त्याचे पतीला मोबाईलचे चार्जर घेण्याच्या कारणावरून शिवीगाळ करून थापडा बुक्यांनी मारहाण केली. हातात विट घेवुन तोंडावर मारल्याने फिर्यादीचा दात पाडुन गंभीर दुखापत केली व पती खुर्चीवर बसलेले होते त्यांना पण खाली पाडुन थापडा बुक्यांनी मारहाण केली. शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी सरस्वती श्यामराव निलंगेकर, वय 70 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. नंदीग्राम सोसायटी नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन 50/2024 कलम 325, 323, 504, 506, 34 भादवि कायदा कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री पांचाळ, मो.नं. 9423437844** हे करीत आहेत.

## 4)शासकीय कामात अडथळा :—

**सिंदखेड :—** दिनांक 22.02.2024 रोजी चे 09.00 वा. चे सुमारास, **मौ. पडसा पैनगंगा नदीचे पुलावर ता. माहुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व तहसिलदार तसेच त्यांचे सहकारी असे गौणखनिज पथकाने शासकीय वाहन क्रं एमएच—26/आर—2609 ने गस्तीवर असतांना गस्त करीत असतांना मौ पडसा पैनगंगा नदीचे पुलावर आले असता यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून शासकीय वाहना समोर येवुन शिवीगाळ करून तुम्हाला बघुन घेतो. कसे रेती चोरी थांबविता. आमचे रेतीचे धंदे कसे बंद करता. तहसिलदार आमचा काय बॉस आहे का असे म्हणुन आम्ही तुम्हाला सोडणार नाही अशि जिवे मारण्याची धमकी देत शासकीय कामात अडथळा निर्माण केला. वगैरे **फिर्यादी चंद्रकांत पांडुरंग बाबर, व्यवसाय नौकरी तलाठी सज्जा मुरली ता. माहुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे सिंदखेड** गुरनं 15/2024 कलम 353, 341, 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2471 कुमरे, मो.क्रं. 7744002471** हे करीत
आहेत.

## 5)फसवणुक :–

**1)विमानतळ** :– दिनांक 01.10.2022 रोजी चे वेळ नक्की नाही, **नेहा महिला मंडळ संस्थेच्या कार्यकारी मंडळ जनार्धननगर शारदानगर रोड नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करून कट रचुन यातील फिर्यादीची बनावट सही करून संस्थेच्या प्रोसिंडिगच्या रजिस्टरमध्ये स्वाक्षऱ्या करून, ठराव पुस्तीका, सर्वसाधारण सभा, फेरफार अर्ज, खोटे शपथपत्र सर्व बनावट कागदपत्रे तयार करून या प्रक्रियेमधील महत्वाचे रजिस्टर, शपथपत्रे, ठराव फिर्यादीच्या परस्पर पुर्वसुचना न देता फिर्यादीच्या नावाच्या पुढे नेहा महिला मंडळ संस्थेच्या कार्यकारी मंडळा मधील सदस्यांनी बनावट कागदपत्रे तयार करून त्याचा खरा म्हणुन उपयोग केला. फिर्यादीला संस्थेच्या कार्यकारणीतुन काढुन सर्व खोटे व बनावट दस्ताऐवज सहाय्यक धर्मदाय आयुक्त नांदेड व शैक्षणीक सर्व कार्यालयामध्ये दाखल करून शासनाची फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी संजय मारोती शेळके, वय 45 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. 9 विजयनगर, विजापुर रोड भारती विदयापीठ जवळ जुळे सोलापुर ता. सोलापुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं. 49/2024 कलम 406, 408, 420, 419, 467, 471, 472, 120(ब) भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनि/श्री गुरमे, मो.नं. 9420437720** हे करीत आहेत.

**2)विमानतळ** :– दिनांक 22.02.2024 रोजी चे सकाळी 10.00 वा. चे सुमारास, **भोकर ते नांदेडकडे येत असतांना डिआरएम ऑफिस समोर नांदेड येथे,** यातील फिर्यादी व त्यांची पत्नी असे भोकर कडुन नांदेडकडे येत असतांना डीआरएम ऑफिस नांदेड समोर रोडवर अज्ञात दोन आरोपीतांनी वय 25 ते 40 वर्षे, वयोगटातील यांनी संगणमत करून फिर्यादीस पोलीस असल्याचे ओळखपत्र दाखवुन फिर्यादी कडील दागीणे पुढे दंगा होत असल्याचे कारण सांगुन विश्वासाने फिर्यादी व त्यांचे पत्नीकडुन एक सोन्याचा पोहेहार दोन तोळे किंमत अंदाजे 98,000/–रू व एक सोन्याची अंगठी तीन ग्रॅमची किंमती 14,000/–रू ची असा एकुण 1,12,000/–रू चे दागीने काढुन घेऊन फिर्यादीची फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी साहेबराव बळीराम राठोड, वय 65 वर्षे, व्यवसाय सेवानिवृत्त कर्मचारी रा. बालाजीनगर तरोडा(बु) नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं. 52/2024 कलम 170, 171, 403, 406, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2372 ताटे, मो.नं. 9860083917** हे करीत आहेत.

## 6)विवाहीतेचा छळ :–

**नांदेड ग्रामीण** :– दिनांक 23.05.2021 ते दिनांक 20.04.2023 चे दरम्यान, **टिपु सुलतान चौक आखाडा बाळापुर ता. कळमनुरी जि. हिंगोली. ह. मु. मिलतनगर देगलुर नाका नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुझे माहेरहुन गाडी घेण्यासाठी पन्नास हजार रूपये घेवुन ये असे म्हणुन थापड बुक्यांनी मारहाण करून उपाशी पोटी ठेवुन तीचा शारिरीक व माणसीक छळ केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 22 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 141/2024 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री कदम , मो.क्रं. 9881475004** हे करीत आहेत.

## 7)अपघात :–

**उमरी** :– दिनांक 21.02.2024 चे सायंकाळी 06.30 वा. चे सुमारास, **उमरी ते कारेगाव फाटा जाणारे रोडवर वाघलवाडा कमानी समोर ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे अंबादास प्यारो कवडेकर, वय 30 वर्षे, रा. हारेगाव ता. धर्माबाद जि. नांदेड** यास यातील नमुद आरोपीने आपला ट्रक क्रमांक एमएच–16/एई–5479 च्या चालकाने दारूचे नशेत रोडचे परिस्थीतीकडे दुर्लक्ष करून आपले ताब्यातील वाहन हयगय व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन उसाचे बैलगाडीस धडक देवुन यातील मयताचे व बैलाचे मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी हनुमंत पोचीराम कवडेकर, वय 30 वर्षे, व्यवसाय शेतमजुरी रा. हारेगाव ता. धर्माबाद जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरनं. 79/2024 कलम 279, 304(अ), 429, भादवी सह कलम 184, 185, 134 मो वा का कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री माने, मो.क्र. 9420827001** हे करीत आहेत.

## 8)जुगार :–

**बिलोली** :–दिनांक 22.02.2024 रोजी चे 17.20 वा. चे सुमारास, **तळयाच्या काठावर चिंचेचे झाडा जवळ बिलोली ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 2000/–रुपये व साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2320 आनंदा गोपीराव शिंदे, ने. पोस्टे बिलोली** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरनं 21/2024 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2542 कांबळे, मो.क्रं. 9423615487** हे करीत आहेत.

## 9)प्रोव्हिबीशन :–

**1)तामसा :–** दिनांक 22.02.2024 रोजी चे 14.45 वा. चे सुमारास, **मौ. आष्टी ते तामसा जाणारे रोडवर नागेश पाटील यांचे शेताजवळ मौ. आष्टी ता. हदगांव जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 3840/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री दिगांबर किशनराव डुडूळे, ने. पोस्टे तामसा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे तामसा** गुरनं 16/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोउपनि/श्री डुडूळे, मो.नं. 9022037761** हे करीत आहेत.

**2)रामतिर्थ :–** दिनांक 22.02.2024 रोजी चे 18.35 वा. चे सुमारास, **मौ. अटकळी येथे बौध्द मंदिराचे समोर पत्राचे शेडमध्ये ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 1470/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/65 दशरथ खंडेराय जांभळीकर, ने. पोस्टे रामतिर्थ** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे रामतिर्थ** गुरनं 45/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोहेकॉ/2079 तमलुरे, मो.नं. 8007997900** हे करीत आहेत.

## 10)खंडणी :–

**विमानतळ :–**दिनांक 21.02.2024 रोजी चे 10.00 वा. चे सुमारास, **महेबुबनगर नांदेड येथे,** यातील नमुद आरोपी हा फिर्यादीचे घरी येऊन तुम्ही मल्टीसर्वीसचे दुकानात भरपुर पैसे कमवता. तुम्ही मला 10,000/–रू खंडणी द्या नाहीतर तुमचे घरचे लोकांना खतम करतो असे म्हणुन शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी सौ. नर्गिसबेगम भ्र. आयुबखॉन, वय 35 वर्षे, व्यवसाय टेलरकाम व गृहणी रा. मेहबुबनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 48/2024 कलम 385, 504, 506 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1986 कानगुले, मो.क्रं. 9657707486** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 74/2023 दिनांक : 23.02.2024**

पोलीस अधीक्षक कार्यालयात " **संत गाडगे बाबा महाराज**" यांची जयंती साजरी

23 फेब्रुवारी, 2024 शुक्रवार रोजी "**संत गाडगे बाबा महाराज** " या महापुरूषांची जयंती पोलीस अधीक्षक कार्यालयात साजरी करण्यात आली. **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधीक्षक नांदेड, यांचे हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या प्रसंगी पोलीस अधीक्षक कार्यालयातील सर्व विभागाचे पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदार मोठया संख्येने उपस्थित राहुन "**संत गाडगे बाबा महाराज** " या महापुरूषास अभिवादन केले. सदर कार्यक्रमाचे आयोजन, **सपोउपनि/सुर्यभान कागणे, पोकॉ/मारोती कांबळे, विनोद भंडारे** यांनी चांगल्या प्रकारे केले आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड


स्वागत कक्ष